**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टे सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ | अंक २७८ | बुधवार ५ ऑगस्ट २०२६ | पाने ४ | मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# बागडपट्टी परिसरातील धार्मिक स्थळाची विटंबना

## अज्ञात समाजकंटकांच्या विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा







**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात आज बुधवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांनी एका धार्मिक स्थळाची विटंबना केल्याचा प्रकार घडला. शहरातील बागडपट्टी परिसरातील नवरंग व्यायामशाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एका जुन्या पडक्या वाड्याच्या बाहेर असलेल्या पठार शहावली दर्गा या धार्मिक स्थळाची तोडफोड करून विटंबना करण्यात आली आहे.

घटनेची माहिती सर्वत्र समजतात बागडपट्टीमध्ये मुस्लिम धर्मीयांसह विविध धर्माचे लोक मोठ्या संख्येने जमा झाले होते. या घटनेची माहिती परिसरातील नागरिकांनी तात्काळ पोलिसांना दिली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून, घटनेची माहिती समजताच तोफखाना पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी येत सदर ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात केला, तसेच विटंबना झालेल्या धार्मिक स्थळाचा तातडीने पंचनामा केला. या घटने संदर्भात जुना मंगळवार बाजार काझी गल्ली येथील आवेज काझी यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तोफखाना पोलिसांच्या पथकाने धार्मिक स्थळाचा पंचनामा करण्याबरोबरच परिसरात असलेले सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू केले आहे.

परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणचे वेगवेगळ्या रस्त्या वरील सीसीटीव्ही फुटेज पाहून आरोपींना पकडण्यासाठी पथके रवाना केली आहे. या घटनेमुळे अहिल्यानगर शहरात खळबळ उडाली असून संतापाची लाट तयार झाली आहे.

### समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याची सर्वधर्मीयांची मागणी

अज्ञात समाजकंटकांचा हा प्रकार म्हणजे अहिल्यानगर शहरातील शांतता आणि सुव्यवस्था बिघडवणे तसेच दोन धर्मामध्ये जातीय तेढ निर्माण करणे, शहरात अशांतता पसरवणे, दंगल घडवणे, हा हेतू असावा असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र नगर शहरात सर्वधर्मीय एकोप्याने आणि जातीय सलोख्यानुसार राहत असून समाजकंटकांच्या अशा प्रकारांना नगरकर बळी पडणार नाहीत अशी भावना जनतेमधून व्यक्त होत आहे. अशा संतापजनक घटनांना वेळीच थांबवण्यासाठी असा प्रकार करणाऱ्या समाजकंटकांना तोफखाना पोलिसांनी तात्काळ अटक करून कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी सर्वधर्मीयांच्या वतीने करण्यात येत आहे.

जादूटोण्याची भीती दाखवून,

# महिलेची तब्बल साडेदहा लाखांची फसवणूक

भोंदू बाबाला अटक । कोतवाली पोलिसांची कामगिरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जादूटोण्याची भीती दाखवून तसेच आजारपण बरे करणे आणि सोन्याची नथ बनवून देण्याच्या बहाण्याने एका महिलेची १० लाख ५० हजार रुपयांची रोकड व २५ तोळे सोन्याचे दागिने लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. फिर्यादी सौ. वृषाली महेश भगत (रा. भुतकरवाडी चौक, तांबे मळा, अहिल्यानगर) या आजारी असल्याने, आरोपी गणेश उर्फ टिंग्या म्हसूदेव पोटे (रा. रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) याने त्यांच्या आजारपणाचा गैरफायदा घेतला. सुरुवातीला त्याने आजार बरे करण्याचे आमिष दाखवून ५० हजार रुपये उकळले. त्यानंतर नवऱ्याला जीवे मारण्याची आणि जादूटोण्याची भीती दाखवून वेळोवेळी २५ तोळे सोन्याचे दागिने काढून घेतले. या फसवणुकीत आरोपीची पत्नी वर्षा गणेश पोटे हिनेदेखील मदत केली. आरोपींनी संगनमत करून कोणतीही विधी न करता फिर्यादींचा विश्वासघात केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पीडित महिलेने कोतवाली पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपी गणेश पोटे व त्याची पत्नी वर्षा पोटे यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपीला तात्काळ अटक केली असून, कोतवाली पोलिस पुढील तपास करत आहेत.

# शासकीय कामात अडथळा; आरोपीला तीन महिने कैद, दंड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांना मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी आरोपी नीलेश सुनील पेंडुरकर (वय २१, रा. ब्राह्मण गल्ली, भिंगार) याला येथील तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. डी. चव्हाण यांनी दोषी ठरवत तीन महिन्यांची शिक्षा आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे.

ही घटना १८ नोव्हेंबर २०१७ रोजी मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात घडली होती. पोलीस नाईक संतोष विजय पानसरे आणि त्यांचे सहकारी पोलीस ठाण्यात कर्तव्य बजावत असताना, तपासासाठी ताब्यात घेतलेल्या आरोपी नीलेश पेंडुरकर याने ठाणे अंमलदारांसमोरच फिर्यादी आणि साक्षीदारांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तोंडावर व पोटावर मारहाण केली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भादंवि कलम ३५३, ३३२, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासी अधिकारी एपीआय कैलास देशमाने यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. खटल्यादरम्यान सरकारी पक्षातर्फे एकूण ५ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी आणि सीसीटीव्ही फुटेज सादर करणारे साक्षीदार व्रजेश गुजराथी यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. पुरावे व युक्तिवाद ग्राह्य धरून

■ पान ४ वर

# अल्पवयीन मुलीची हत्या करून पुरावा नष्ट करणाऱ्या आई-वडिलांसह आजीला जन्मठेप

पुराव्याअभावी मामाची निर्दोष सुटका । जिल्हा न्यायालयाचा निकाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रेमसंबंधांतून घराची प्रतिष्ठा जाईल या भीतीने स्वतःच्याच अल्पवयीन
मुलीची हत्या करून तिचा मृतदेह जाळून पुरावा नष्ट करणाऱ्या आई, वडील आणि आजीला जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या खटल्यातील मामाची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.बी. कचरे यांनी हा ऐतिहासिक निर्णय दिला.

शेवगाव तालुक्यातील शेकटे बुद्रुक येथे चार वर्षांपूर्वी, ऑक्टोबर २०२२

मध्ये ही भीषण घटना घडली होती. पीडित अल्पवयीन मुलगी आणि तक्रारदार

प्रियकर यांच्यातील प्रेमसंबंधांचा राग धरून आरोपींनी प्रियकराला धमकी दिली होती. दिनांक ७ ऑक्टोबर २०२२ रोजी रात्री पीडितेचा खून करून, मृतदेह घरासमोर जाळून पुरावा नष्ट करण्यासाठी राख गायब करण्यात आली. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२, २०१ आणि १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तत्कालीन सरपंच असलेली आरोपी छाया गरड हिने मुलीने

■ पान ४ वर

# स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून तीन महिन्यांत ७८६ गुन्हेगार ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विविध कारवायांत सुमारे पावणेआठ कोटींचा मुद्देमाल जप्त
पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने मागील तीन महिन्यांत (१ मे ते ३१ जुलै २०२६) गुन्हेगारी नियंत्रण आणि बेकायदेशीर धंद्यांविरोधात धडक कारवाई करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या विशेष मोहिमेदरम्यान खुन, दरोडा, घरफोडी, जबरी चोरी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांसह अवैध वाळू उपसा, गुटखा, दारूबंदी आणि एनडीपीएस (मादक पदार्थ) विरोधी धडक छापे टाकण्यात आले.एकूण ४४१ यशस्वी कारवाया करून ७८६ गुन्हेगार ताब्यात घेण्यात आले. तर एकूण ७ कोटी ८४ लाख ७१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अवैध वाळू उपशावर कारवाई करत सर्वाधिक ३.६९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तर १.१० कोटींपेक्षा जास्त किमतीचा गुटखा जप्त केला गेला. दारूबंदी कायद्यान्वये सर्वाधिक १५३ कारवाया करण्यात आल्या. सराईत गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी विशेष

■ पान ४ वर

# मंदिर केंद्रीत व्यवस्था निर्माण झाल्यास हिंदू समाजाला पुनर्वैभव प्राप्त होईल- विवेक कुलकर्णी

विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयाम व ब्राह्मण सेवा संघाचा उपक्रम
अर्चक,पुरोहित सेवा शिबिराचे माध्यमातून आरोग्य सेवा व विविध योजनांचे मार्गदर्शन




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुरोहितांचे हिंदू जीवनातील स्थान महत्त्वाचे आहे. पूर्वी हिंदू जीवन पद्धती मंदिर अर्चक आणि पुरोहित या व्यवस्थेची अनुकूल होती. जोपर्यंत हिंदू जीवनपद्धती मंदिर केंद्रित होती तोपर्यंत हिंदू समाजाकडे वाकडी नजर करून बघण्याची कोणाकडे ही शक्ती नव्हती.ज्यावेळेस हिंदुस्थानात परकीय शक्तींची आक्रमणे झाली.त्यावेळेस त्यांनी मंदिर व्यवस्था मोडीत काढण्यासाठी मंदिरांवर हल्ले करून मंदिराचे अस्तित्व संपवण्यासाठी प्रयत्न केले आहेत.हिंदू धर्मा विरोधात ज्यांनी आक्रमणे केली त्यांची जीवन व्यवस्था आजही उपासना पद्धतीने नुसार आहे.

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर, अर्चक,पुरोहित या आयामाच्या वतीने समाजातील अर्चक व पुरोहित यांचे एकत्रीकरण होत आहे. तसेच त्यांच्या आरोग्याच्या समस्या तसेच विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून त्यांचा विकास होण्यास मदत होईल. मंदिर केंद्रीत व्यवस्था निर्माण झाल्यास हिंदू समाजाला पुनर्वैभव प्राप्त होईल.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद,बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

कर्जत येथील साई हॉटेल येथे विश्व हिंदू परिषद,मंदिर अर्चक पुरोहित आयाम व ब्राह्मण सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अर्चक, पुरोहित सेवा शिबिर संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत हभप मोहनबुवा रामदासी, बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक

■ पान ४ वर

# आध्यात्मिक विचारांतूनच आपले जीवन सार्थकी लागू शकते - आ संग्राम जगताप

माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र ही संतांची भुमी आहे, संतांनी मनुष्याचे जीवन सत्कारणी लावण्यासाठी दिलेले विचार लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. संत सावता महाराजांनी आपल्या कार्यातून समाजोद्धाराचे महान कार्य केले आहे. आध्यात्मिक विचारांचा वारसा समाजामध्ये तयार झाला पाहिजे, यातूनच आपले जीवन सार्थकी लागू शकते. आजच्या युवा पिढीने संत सावता महाराज यांचे विचार आत्मसात केले पाहिजे. उत्सव समितीच्यावतीने गेल्या २० वर्षांपासून माळीवाडा येथे या सप्ताहाचे आयोजन करत आहे. या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांची सेवा उपलब्ध होत असल्याने चांगले धार्मिक वातावरण निर्माण होत आहे. सप्ताहांतर्गत होत असलेले विविध सामाजिक उपक्रमातून समाजाला दिशा मिळत असल्याने असे धार्मिक कार्यक्रम नियमित होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.



माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे उदघाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज, देवस्थानचे अध्यक्ष ऍड अभय आगरकर ,हभप विश्वनाथ आण्णा राऊत, उत्सव समितीचे प्रमुख छबुनाना जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर,

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### गांधी महाविद्यालय कडा येथे पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमास मान्यता

अहिल्यानगर- श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा या संस्थेचे श्रीमती. एस. के. गांधी कला, अमोलक विज्ञान आणि पी.एच. गांधी वाणिज्य महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्रामध्ये वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका शिक्षणक्रम विद्यापीठाची नुकतीच मान्यता मिळालेली आहे. महाविद्यालयांमध्ये मुक्त विद्यापीठाचे एकूण १९ शिक्षणक्रम सुरू आहेत. महाराष्ट्र राज्यातून तसेच भारतातील विविध राज्यातील विद्यार्थी या शिक्षणक्रमास प्रवेश घेतात. विद्यापीठाचे ब्रीदवाक्य ''ज्ञानगंगा घरोघरी'' प्रमाणे महाविद्यालयातील अभ्यासकेंद्र कार्य करत आहे त्यामध्ये वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका शिक्षणक्रम महत्त्वाचा अभ्यासक्रम आहे.

या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याची पात्रता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा वृत्तपत्रिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम उत्तीर्ण, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी किंवा राज्यातील समकक्ष परीक्षा उत्तीर्ण, १९७५ पूर्वीचे माध्यमिक शालांत परीक्षा अकरावी उत्तीर्ण, एस एस सी उत्तीर्ण झाल्यानंतर सलग किमान दोन वर्षे मुदतीचा सरकारमान्य पदवीका शिक्षणक्रम उत्तीर्ण इत्यादी पात्रता असणे आवश्यक आहे. या सर्व अभ्यासकेंद्राच्या यशस्वीतेसाठी श्री.अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, कोषाध्यक्ष, संचालक मंडळ अनमोल असे प्रोत्साहन देत आहे. गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी, अभ्यासकेंद्राचे केंद्रसंयोजक प्रोफेसर डॉ.अशोक कोरडे यांचे अथक परिश्रम या अभ्यासकेंद्राच्या यशस्वीतेसाठी महत्वपूर्ण ठरत आहे. पत्रकारिता अभ्यासक्रम सुरू झाल्यामुळे ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण असून विद्यापीठाने प्रवेश सुरू केलेले आहेत.

### वंदना वसंत तांदुळवाडकर यांचे निधन

अहिल्यानगर- दादा चौधरी विद्यालयाच्या माजी शिक्षिका सौ. वंदना वसंत तांदुळवाडकर यांचे दि. ३ ऑगस्ट २०२६रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या मागे मुलगा उन्मेष तांदुळवाडक, सून डॉ. ऋचा तांदुळवाडक आणि नात असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्रातील एक प्रेमळ, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थीप्रिय शिक्षिका हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.



## अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातर्फे अमली पदार्थविरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तरुण पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचविणे, व्यसनमुक्त समाज घडविणे आणि अहिल्यानगर जिल्हा ड्रग्जमुक्त करण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता भव्य अमली पदार्थविरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही रॅली जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच अहिल्यानगर शहर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस मुख्यालयातून सुरू होणार आहे.

या जनजागृती रॅलीत शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, वकील, पत्रकार, लोकप्रतिनिधी, डॉक्टर, शांतता समितीचे सदस्य, विविध धर्मगुरू, सायकलिंग संघटना, क्रीडा संस्था, समाजसेवी संघटना तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाने केले आहे.

अमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन जनजागृती करणे ही काळाची गरज असल्याचे पोलीस प्रशासनाने नमूद केले असून, या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून जिल्हा व्यसनमुक्त करण्याच्या चळवळीत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## समाजातील कोणत्याही संकटात लायन्स वंचितांच्या पाठिशी – प्रविण गुलाटी



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजातील गरजू, वंचित आणि संकटग्रस्त घटकांना आधार देण्याचे कार्य लायन्स क्लब सातत्याने करत असून, कोणतेही संकट आले तरी लायन्स व लिओ क्लब ऑफ अहमदनगरने आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती दिली आहे. कोरोनाकाळात सुरू करण्यात आलेली लंगर सेवा आजही अविरत सुरू असून, या उपक्रमाने देशासह परदेशातील लायन्स संघटनांचेही लक्ष वेधून घेतले आहे. त्याचबरोबर लिओ क्लबच्या माध्यमातून युवक-युवती मोठ्या संख्येने सामाजिक चळवळीशी जोडले जात असल्याचे प्रतिपादन पदग्रहण अधिकारी प्रविण गुलाटी यांनी केले.

अहिल्यानगर शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर आणि लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदग्रहण सोहळा नगर-संभाजीनगर मार्गावरील महाराजा हॉटेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास रिजन चेअरमन संदीप गोंदकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी लायन्सचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोहळ्यात लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा हरजितसिंग वधवा यांनी स्वीकारली. सचिवपदी हरिष हरवानी तर खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारला. मावळते अध्यक्ष डॉ. संजय असनानी, सचिव प्रशांत मुनोत आणि खजिनदार दिलीप कुलकर्णी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांकडे पदभार सोपविला. तसेच लिओ क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन किथानी, सचिवपदी रित जाजू यांनी पदभार स्वीकारला.

## 'शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक गरजू महिलेपर्यंत पोहोचविणार'– सौ. स्वाती शिरसुल

### पद्मशाली महिला बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचा संकल्प

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** पद्मशाली समाजातील महिलांना शासकीय योजनांची माहिती, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने नव्याने स्थापन झालेल्या पद्मशाली महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या पदग्रहण व नोंदणी प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. दिल्लीगेट येथील संपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात समाजातील ज्येष्ठ महिला, माजी नगरसेविका आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मशाली समाजाच्या प्रथम महिला नगरसेविका तथा ९४ वर्षीय ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती सखुबाई संदुपटला या होत्या. प्रारंभी समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी नगरसेविका सौ. लक्ष्मीबाई गुंडू, सौ. राधाबाई गुरुड, शशिकला मुदीगंटी, सौ. विनाताई बोज्जा, सौ. अर्चनाताई बिज्या आदी मान्यवर महिलांचा सत्कार करण्यात आला.

नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. स्वाती शिरसुल आपल्या भाषणात म्हणाल्या की, 'पद्मशाली समाजातील अनेक महिला पूर्वी विडी व्यवसायावर अवलंबून होत्या. हा व्यवसाय जवळपास बंद पडल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. अशा महिलांना शासनाच्या विविध योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी संस्था सातत्याने कार्य करणार आहे.'

त्या पुढे म्हणाल्या, ''समाजातील महिलांमध्ये संघटन, नेतृत्व आणि आत्मविश्वास निर्माण करण्याबरोबरच तेलुगू भाषा, संस्कृती आणि सामाजिक मूल्यांचे जतन करण्यासाठीही विविध उपक्रम राबविण्यात येतील. प्रधानमंत्री आवास योजना तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक पात्र कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी संस्था पुढाकार घेईल. विशेषतः घर नसलेल्या गरजू कुटुंबांसाठी घरकुल योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल.''


यावेळी काँग्रेसच्या माजी जिल्हाध्यक्षा तथा पद्मशाली समाज महिला मंडळाच्या माजी अध्यक्षा सौ. शामला बोरा यांनी महिलांना संघटित होण्याचे आवाहन केले. माजी नगरसेविका सौ. लक्ष्मीबाई गुंडू यांनी समाजातील विवाह विषयक समस्या मांडत युवक-युवतींच्या अपेक्षा कमी करून योग्य वयात विवाह होण्यासाठी संस्थेने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## पैठणमध्ये एका रात्रीत १६ गाढवांची चोरी; सीसीटीव्हीत आयशरमधून आलेले युवक कैद

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहर व परिसरात एका रात्रीत तब्बल १६ गाढवांची चोरी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, चोरट्यांचा तातडीने शोध घेण्याची मागणी होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा पाच ते सहा युवक आयशर वाहनातून पैठणमध्ये दाखल झाले. चोरीच्या ठिकाणी गाढवे आयशरमध्ये भरताना त्यांचे चित्रण सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती समोर आली आहे. या फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.



या चोरीमध्ये अंबादास छगण रोकडे यांची ५, अक्षय दिल्लीवाले यांची ३, रोहिदास सुभाष पंजावाले यांची ५, विनोद बबण पंजावाले यांची २ आणि अनिल भारत रोकडे यांचे १ असे एकूण १६ गाढवे चोरीला गेली आहेत.

सीसीटीव्हीचे फुटेज हाती लागले असताना पोलिस चोरट्यांचा छडा लावून चोरी गेलेली जनावरे हस्तगत करण्यात यशस्वी ठरणार का? असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

## डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी प्रथम वर्ष परीक्षेचा ९९.२१% टक्के निकाल

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी प्रथम वर्ष परीक्षेचा निकाल ९९.२१%टक्के लागला आहे. या परीक्षेत ६३० विद्यार्थ्यांपैकी ६२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या निकालातील विशेष बाब म्हणजे २७६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह यश मिळविले असून, ३७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तर उर्वरित विद्यार्थ्यांनी उच्च द्वितीय व द्वितीय श्रेणीत यश संपादन केले आहे. केवळ ५ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. अनुपस्थित विद्यार्थ्यांची संख्या शून्य आहे.महाविद्यालयातील सातत्यपूर्ण शैक्षणिक नियोजन, नियमित मार्गदर्शन, गुणवत्तापूर्ण अध्यापनामुळे निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम राहिली. या निकालाबाबत फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील म्हणाले.

आजचा उत्कृष्ट निकाल हा केवळ आकड्यांचा विजय नसून गुणवत्ता, शिस्त, कठोर परिश्रम आणि उत्कृष्ट शैक्षणिक संस्कृतीचा विजय आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची निवड करताना केवळ जाहिराती किंवा बाह्य आकर्षण न पाहता, विद्यापीठाचा निकाल, अनुभवी प्राध्यापक, संशोधन, नवोपक्रम आणि प्लेसमेंट यासारख्या वस्तुनिष्ठ निकषांचा विचार केला. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे, उद्योगाभिमुख आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व विद्यार्थी, पालक, प्राचार्य, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत समर्थ लखापतीला कास्यपदक

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बारामती येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूल मधील इयत्ता सातवी मधील इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी समर्थ चेतन लखापती याने बारा वर्षाच्या वयोगटात भाग घेऊन अवघ्या चार महिन्यातील सरावांमध्ये ४० स्केटिंग स्पर्धकांमध्ये विजयी घोडदौड करीत टॉप टेन मध्ये कांस्यपदक मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळवीत शाळेबरोबरच अहिल्यानगरचे नाव उज्वल केले आहे.

महाराष्ट्र राज्य मॅरेथॉन स्पर्धा मध्ये ७०० ते ८०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. अहिल्यानगर मॅरेथॉन स्केटिंग क्लबमधून ७० स्पर्धक होते. ४ ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत चमकदार कामगिरी दाखवली. त्यामुळे क्लबला ३५ गोल्ड मेडल, २० सिल्वर मेडल व १५ कांस्य मेडल तसेच सर्टिफिकेट, ट्रॉफी मिळाल्या. अहिल्यानगर मॅरेथॉन स्केटिंग क्लब ने २४ जिल्ह्यांमधून प्रथम क्रमांक पटकावून सहा फूट उंचीची ट्रॉफी मिळवली महाराष्ट्र राज्य ट्रॉफीवर क्लब ने नाव कोरल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.




समर्थ हा चेतन लखापती यांचा मुलगा असून ते आमदार संग्राम जगताप यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्याला क्लबचे अध्यक्ष गोरख धात्रक, सुशील केदार व आदित्य पालवे या कोचांचे मार्गदर्शन लाभले. मला प्रत्येक स्पर्धे साठी विविध परीक्षांसाठी कायम माझे आजोबा मुकुंद लखापती यांची प्रेरणा तर आई-वडील यांचे मोलाचे योगदान मिळत असते असे समर्थ याने आवर्जून सांगितले.

## दहीगाव (शे.) येथील ज्येष्ठ नागरिक श्री अमरचंदजी किसनदासजी शिंगवी यांचे निधन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**दहीगाव (शे.)–** दहीगाव (शे.) येथील ज्येष्ठ नागरिक श्री अमरचंदजी किसनदासजी शिंगवी (अंबर काका) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच दहीगाव (शे.) परिसरात शोककळा पसरली असून, विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक व समाजबांधवांनी दुःख व्यक्त केले आहे.

श्री शिंगवी हे श्री रमेशलालजी शिंगवी तसेच स्व. महावीर (बाळुशेट) शिंगवी (माजी सरपंच, दहीगाव शे.) यांचे वडील होते. तसेच श्री आनंद आणि निखिल शिंगवी आणि अहिल्यानगर शहर मध्य मंडळ भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सौ. प्रांजल पियुष संचेती यांचे आजोबा होते.



साधी राहणी, प्रेमळ स्वभाव, सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व आणि समाजाप्रती असलेली आत्मीयता यामुळे ते परिसरात ''अंबर काका'' म्हणून परिचित होते. त्यांनी आयुष्यभर जपलेली माणुसकी, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी यामुळे त्यांच्या जाण्याने समाजातील एक जेष्ठ, स्नेहाळ व आदरणीय व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, जावई, नातवंडे, पणतवंडे, नातजावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शिंगवी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, दहीगाव (शे.) सह परिसरातील नागरिक, मित्रपरिवार आणि समाजबांधवांकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## शब्दकोडे क्रमांक : २२



**आडवे शब्द :** १. पहाट ३. आक्षेप ५. शिकार ७. धडा ८. हिंदीत-औषध ९. पवित्र १०. फुकट गेलेला वा बिनकामाचा १२. चोरी करणारा १४. ताडाच्या झाडापासून मिळणारे पेय १५. विस्मरण १६. बुद्धिबळातील एक डाव १७. अधम १८. देश २०. तलवारीचा जोडीदार २१. उपस्थित २२. तांदळाची एक जात २४. नाव २६. फटाका २७. अलमारी २९. लोभ ३०. एखाद्याविषयी मनात उमजणारी काळजी ३१. नि:स्वार्थ देणगी ३४. ऐट ३५. माया ३७. वारसा चालवण्याची परंपरा ३९. पत्रातील मजकूर ४०. जड ४२. एक पाण्याचा स्त्रोत ४३. संगीत सप्तकातील तिसरा स्वर ४४. इराण्याच्या हॉटेलमध्ये मिळतो तो '** मस्का' ४५. पावसाची आतुरतेने वाट पाहणारा एक काल्पनिक पक्षी ४७. इंग्रजीत-कावळा

**उभे शब्द :** १. सरळ रेषेतला २. किनार ३. वारा ४. कलाकार सादर करतो ती ५. एक शेंगभाजी ५. इंग्रजीत-धाव ८. एखाद्याविषयी मनात असलेली कीव ९. एक लहान आकाराचा पक्षी १०. आळी ११. सरकार १३. शिवार नांगरण्यासाठी वापरतात तो प्राणी १४. ज्वर १५. वितरण करणारा १६. प्रेरणा १७. आदिवासी वसाहत १८. निगा १९. वस्तू २१. आक्षेप २२. किल्ला २३. थोर २५. चित्रीकरणासाठी प्रसिद्ध असलेले मुंबईच्या मालाड येथील एक ठिकाण २६. लहान मूल २८. मुखोद्गत ३०. कलाकार ३१. दैत्य ३२. ग्रामीण बोलीत सर्व ३३. निसर्ग ३५. चिंतन ३६. नायिका ३८. पारंबी वा फांदी ४१. धाक

### शब्दकोडे क्रमांक : २१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रा | ची | | सा | क्ष | र | | झें | डा | | दि | वा |
| ण | | धो | र | ण | | ला | डू | | ज | न | क |
| | सौ | | ण | | खो | ल | | स | | क | डा |
| वे | त | न | | पा | त | | अ | व | ता | र | |
| | न | | का | ढा | | बा | | ल | स | | टी |
| आ | | क्षा | र | | ब | र | क | त | | ह | |
| र | वी | | भा | ला | | का | ळी | | ज | मी | न |
| सा | | नी | र | | छा | वा | | क | म | | र |
| | सा | ल | | सं | प | | न | ष्ट | | का | डी |
| पा | व | | रं | ग | | पो | ट | | ख | च | |
| म | ली | न | | त | डा | | रं | ग | त | | पो |
| र | | ग | ती | | स | र | ग | म | | सा | त |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### वडगाव मावळ येथे ग्राहक पंचायतचे राज्य अधिवेशन



अहिल्यानगर - ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे संस्थापक ग्राहकतीर्थ बिंदूमाधव जोशी यांच्या पवित्र स्मृतीला स्मरून ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेचे दोन दिवसीय भव्य राज्य अधिवेशन व राज्यस्तरीय अभ्यासवर्ग येत्या ८ व ९ ऑगस्ट रोजी मुंबई-पुणे महामार्गावरील वडगाव मावळ येथे आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती राज्य अध्यक्ष विजय लाड यांनी दिली. या अधिवेशनाच्या आयोजनानिमित्त आयोजित ऑनलाइन बैठकीत त्यांनी अहिल्यानगर येथील साधकांशी संवाद साधला तेव्हा ते बोलत होते.ते पुढे म्हणाले, ''ग्राहक देवो भव'' हे ब्रीद साकारून व ग्राहक हा राजाच आहे हे या दृढ विश्वासावर हा राज्यस्तरीय अभ्यास वर्ग आयोजित केला आहे. या राज्य अधिवेशनासाठी राज्यभरातील ५०० हून अधिक ग्राहक पदाधिकारी, साधक सहभागी होणार आहेत. या दोन दिवसीय राज्य अधिवेशनाचे उद्घाटन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष मा.न्यायमूर्ती श्री. सुरेंद्र तावडे यांच्या शुभहस्ते होणार आहे.या अधिवेशनात विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्रातील प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या ऑनलाईन बैठकीला जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, जिल्हा संघटक प्रा. राजेंद्र कळमकर, जिल्हा सचिव अ‍ॅड.सिद्धार्थ वाघमारे, सहसचिव संजय जोशी, जिल्हा कोष प्रमुख कृष्णराव बागडे सदस्य सौ.संज्योत रसाळ सौ.आशा सातपुते, संजीव परशुरामी, रवी सातपुते, सर्वोत्तम क्षीरसागर उपस्थित होते.

### सेंट्रल बँकेच्या एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचा लाभ घ्यावा



अहिल्यानगर- सेंट्रल बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या वतीने बँकेचे क्षेत्रीय प्रमुख नरेश कुमार दुबे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दोन ठिकाणी करण्यात आले आहे. दुपारी ४ वाजता नागापूर एमआयडीसी येथील आमी हॉल येथे तसेच त्याच दिवशी (शुक्रवारी) दुपारी ४ वाजता पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी येथील कुणाल पॅलेस येथे हा कार्यक्रम होणार आहे. एमएसएमई क्षेत्रातील उद्योजकांना उद्योग विस्तार, नवीन प्रकल्प, यंत्रसामग्री खरेदी, कार्यभांडवल तसेच विविध बँकिंग योजनांची माहिती आणि कर्जसुविधांबाबत मार्गदर्शन या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. पात्र उद्योजकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांची माहिती देऊन त्यांना आर्थिक बळ देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमास उद्योजक, व्यावसायिक तसेच इच्छुक नागरिकांनी मोठ्या संख्येने राहावे असे आवाहन क्षेत्रीय प्रमुख नरेशकुमार दुबे यांनी केले आहे.

### दिल्ली गेटवरून 'राष्ट्रीय धारणालय क्रांती'ची घोषणा

अहिल्यानगर - जातिव्यवस्था, स्त्रीदास्य, मतदास्य, अंधश्रद्धा, दैववाद, व्यक्तिपूजा आणि स्वार्थी सत्तालालसा या भारताच्या समताधिष्ठित, विज्ञाननिष्ठ आणि संविधाननिष्ठ राष्ट्रीय धारणालयाच्या शत्रू प्रवृत्ती आहेत. या मानसिक गुलामगिरीविरुद्ध ८ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगरच्या ऐतिहासिक दिल्ली गेटवरून 'राष्ट्रीय धारणालय क्रांती'ची घोषणा करण्यात येणार आहे. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने 'जंतर-मंतर क्रांती दिना'निमित्त या लोकशिक्षण चळवळीचा प्रारंभ होणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली. व्यक्तीच्या मेंदूत आयुष्यभर साठणारे ज्ञान, अनुभव, संस्कार, श्रद्धा, भीती आणि पूर्वग्रह यांचे बिगर-आनुवंशिक माहितीभांडार म्हणजे धारणालय. हेच व्यक्तीच्या वर्तनाची अंतर्गत राज्यघटना म्हणून काम करते. धारणालयात जातीयता, स्त्रीविरोध, मतदास्य आणि अंधश्रद्धा रुजल्यास सामाजिक विषमता आणि मानसिक गुलामगिरी टिकून राहते. मात्र संघर्ष माणसाविरुद्ध नसून, त्याच्या धारणालयातील अन्यायकारी आणि कालबाह्य प्रवृत्तींविरुद्ध आहे. ''माणूस शत्रू नाही; जातिव्यवस्था, स्त्रीदास्य, मतदास्य, अंधश्रद्धा आणि दैववाद या राष्ट्रीय धारणालयाच्या शत्रू प्रवृत्ती आहेत,'' हा या क्रांतीचा मुख्य संदेश असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. न्यूरोप्लास्टिसिटीमुळे मेंदूच्या सवयी, शिकण्याच्या पद्धती आणि विचार जाळे बदलता येतात. त्यामुळे जुने धारणालय हे प्रारब्ध नसून, ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, आत्मपरीक्षण आणि विवेकाच्या साहाय्याने त्याची पुनर्घटना करता येते. ही क्षमता मानवाला मिळालेले निसर्गाचे वैज्ञानिक पसायदान असल्याचे म्हटले आहे.या चळवळीत राष्ट्रीय तिरंगा हाच राष्ट्रीय धारणालयाचे प्रतीक म्हणून मांडला जाणार आहे. केशरी रंग लोकभक्तीचा, पांढरा ज्ञानभक्तीचा, हिरवा कर्मभक्तीचा; तर अशोकचक्र संविधानिक नैतिकता, कायद्याचे राज्य आणि गतिशील लोकशाहीचे प्रतीक असेल. लोकभक्तीविना सत्ता स्वार्थी, ज्ञानभक्तीविना सत्ता आंधळी, कर्मभक्तीविना सत्ता निष्प्रभ आणि संविधानिक नैतिकतेविना लोकशाही दिशाहीन होते. म्हणून तिरंगा केवळ हातात नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या धारणालयात रुजला पाहिजे, अशी भावना अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली आहे.

## महापुरात मृत झालेल्या जनावरांच्या नुकसानभरपाईचा धनादेश शेतकऱ्याला सुपूर्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** २०२५ मध्ये गोदावरी नदीला आलेल्या महापुरात गाय व वासरासह जनावरांचा मृत्यू झालेल्या शेतकरी ईश्वर तुकाराम गिरगे यांना शासनाकडून ६० हजार रुपयांचा नुकसानभरपाईचा धनादेश मंगळवारी सुपूर्त करण्यात आला.

पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलासबापू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सदस्य शिवराज (भैय्यासाहेब) भुमरे व पंचायत समिती सदस्या सखुताई झारगड यांच्या हस्ते हा धनादेश ईश्वर गिरगे यांना देण्यात आला.

यावेळी डॉ. भारत झारगड, संतोष बोटे, भागवत गिरगे, विक्रम गिरगे, ज्ञानेश्वर दसपुते, कानिफनाथ दसपुते, बदाम दसपुते, रियाकत पठाण, योगेश पाचे आदी उपस्थित होते.

यावेळी महापुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या विविध मदत योजनांचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

## पैठण तालुक्यात पावसाची ओढ; कापसाला फक्त जीवदान, शेतकऱ्यांची चिंता कायम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** यंदाच्या खरीप हंगामात पैठण तालुक्यात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. अधूनमधून झालेल्या हलक्या सरींमुळे कापूस पिकाला केवळ जीवदान मिळाले असले, तरी पिकांच्या जोमदार वाढीसाठी आवश्यक असलेला दमदार पाऊस अद्याप झालेला नाही.

तालुक्यात बहुतांश भागात कापूस पिकाची उगवण चांगली झाली असली, तरी पावसाअभावी वाढ मंदावली आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या हलक्या पावसामुळे पिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र हा पाऊस



अपुरा असल्याने शेतकऱ्यांच्या आशा अजूनही आभाळावरच खिळल्या आहेत. हवामान खात्याने पावसाचा अंदाज व्यक्त केला असला, तरी प्रत्यक्षात अपेक्षित पाऊस होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पुढील काही दिवसांत दमदार पाऊस झाला तरच कापूस पिकाची वाढ सुधारेल आणि उत्पादनाच्या अपेक्षा कायम राहतील. अन्यथा उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करत आहेत.

## 'गुड टच-बॅड टच'ची शालेय मुलींमध्ये जनजागृती

### सेवाप्रीत सोशल फाउंडेशनचा उपक्रम । पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयात विद्यार्थिनींना सुरक्षिततेचे धडे; शैक्षणिक साहित्याचेही वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचारांना आळा घालण्यासाठी आणि विद्यार्थिनींमध्ये स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने विशेष जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहरातील चितळे रोडवरील पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयात विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन कार्यक्रमातून 'गुड टच' आणि 'बॅड टच' याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील करण्यात आले.

कार्यक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने मुलींनी उपस्थित राहून सुरक्षिततेविषयीची माहिती जाणून घेतली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींना कोणत्याही अनुचित स्पर्शाची ओळख कशी करावी, अशा प्रसंगी भीती न बाळगता विश्वासू व्यक्तीशी संवाद कसा साधावा आणि स्वतःच्या सुरक्षेसाठी कोणती खबरदारी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी डॉ. सिमरन वधवा यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत 'गुड टच' आणि 'बॅड टच' यातील फरक अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितला. मुलींनी कोणत्याही प्रकारच्या अनुचित वर्तनाला घाबरून न जाता त्याविरोधात आवाज उठविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. स्वतःची सुरक्षितता ही प्रत्येक मुलीचा अधिकार असून योग्य वेळी योग्य निर्णय घेणे आणि विश्वासू पालक, शिक्षक अथवा संबंधित



व्यक्तींशी संवाद साधणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रकल्प प्रमुख अन्नू थापर यांनी या अभियानामागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, आजच्या काळात मुलींमध्ये लहान वयापासूनच सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. शिक्षणाबरोबरच स्वसंरक्षण आणि आत्मविश्वासाची जाणीव विद्यार्थिनींमध्ये निर्माण व्हावी आणि मुलींच्या शिक्षणआसाठी सेवाप्रीत सोशल फाउंडेशन सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याची माहिती दिली.

संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सेवाप्रीत सोशल फाउंडेशन मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देत विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी जनजागृती करणे हीदेखील संस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे. प्रत्येक मुलीच्या स्वप्नांना बळ देऊन तिला आत्मविश्वासाने जगता यावे, यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. ''मुलगी शिकली तर समाज घडतो,'' या विचारातून शिक्षण आणि सुरक्षितता या दोन्ही बाबींवर समान भर देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमादरम्यान विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव, आत्मविश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमास सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या अनिता मंत्री, नीलिमा शहा, निशा अग्रवाल, पूजा बजाज, राखी चंदे, अर्चना खंडेलवाल, गीता माळवदे आणि सविता चड्डा यांची उपस्थिती होती. तसेच या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दिशा झालानी, दक्ष मुनोत, साक्षी कपूर आणि गायत्री लोंढे यांनी विशेष योगदान दिले.

## रंगात दंगले चिमुकले हात; जिल्हा वाचनालयाच्या चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### स्वातंत्र्य दिनानिमित्त सुमारे १,१०० विद्यार्थ्यांचा सहभाग; १८ ऑगस्टला पारितोषिक वितरण सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय चित्रकला स्पर्धेला यंदा विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कोऱ्या कागदावर आपल्या कल्पनाशक्तीला रंगांची सुंदर साथ देत चिमुकल्यांनी देशभक्ती, निसर्ग, सामाजिक संदेश आणि विविध विषयांवरील आकर्षक चित्रे साकारली. बाई इचरजबाई फिरोदिया शाळेत पार पडलेल्या या स्पर्धेत सुमारे १,१०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत स्पर्धेला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष वैद्य राजा ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपाध्यक्ष दिलीप पांढरे, सहकार्यवाह राहुल तांबोळी, संचालिका शिल्पा रसाळ, स्पर्धेचे समन्वयक किरण आगरवाल, कवी चंद्रकांत पालवे, लेखक गणेश भगत, सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल,



पल्लवी कुकडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, आर्यन मडूर, ओम केदारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष वैद्य राजा ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ''चित्रकला ही केवळ रंगांची उधळण नसून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, सर्जनशीलतेला आणि संवेदनशीलतेला दिशा देणारी प्रभावी कला आहे. पुस्तक वाचनासोबतच चित्रकला, लेखन आणि सांस्कृतिक उपक्रमांमधून मुलांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते. जिल्हा वाचनालय अशा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असून भविष्यातही अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप दिले जाईल,'' असे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेत विविध विषयांवर कल्पक आणि आकर्षक चित्रे रेखाटली. पालक व शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत अशा उपक्रमांचे स्वागत केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धेचे समन्वयक किरण आगरवाल यांनी दिली.

## पैठणमध्ये शॉर्टसर्किटमुळे घराला भीषण आग; संसारोपयोगी साहित्य जळून खाक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील इंदिरानगर परिसरात सोमवारी दुपारी शॉर्टसर्किटमुळे एका घराला भीषण आग लागून घरातील संसारोपयोगी साहित्य, धान्य, कपडे, फर्निचर व अन्य वस्तू जळून खाक झाल्या. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी संबंधित कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरानगर येथील कडूबाई भगवान धुंगासे व आशाताई



धुंगासे यांच्या घरात अचानक आग लागली. प्राथमिक तपासात शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने घरातील बहुतेक साहित्य जळून खाक झाले.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पैठण नगराध्यक्ष विद्या कावसानगर यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. तसेच पीडित धुंगासे कुटुंबाची भेट घेऊन त्यांना धीर देत आवश्यक मदतीचे आश्वासन दिले.

## अ‍ॅट्रॉसिटीच्या केसमधुन तीन आरोपीची निर्दोष मुक्तता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा तदर्थ न्यायाधीश श्री पी.पी. देशपांडे यांनी भादवि आणि अनुसूचित जाती जमाती कायद्यान्वये दाखल असलेल्या खटल्यातून तीन आरोपीचीं गुणदोषावर मुक्तता केली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, गदेवाडी ता.शेवगाव जि अहमदनगर येथील महिला फिर्यादी समिंद्रा गुजर हिने शेवगाव पोलीस स्टेशन येथे काकासाहेब मारकंडे, गिताबाई मारकंडे आणि राजेंद्र नेव्हल सर्व रा. गदेवाडी ता.शेवगाव यांचे विरुद्ध भादवि आणि अनुसूचित जातीजमाती कायद्यानुसार जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून गुन्हा दाखल केला.

सदर खटल्यात फिर्यादी हि चर्मकार समाजाची आहे तर आरोपी हे मराठा समाजातील आहेत अशी नोंद करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याचा तपास करुन न्यायालयात दोषारोपपत्र डिवायएसपी सुदर्शन मुंढे यांनी अहमदनगर जिल्हा न्यायालय येथे दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी तदर्थ जिल्हा न्यायाधीश पी.पी.देशपांडे यांचे समोर झाली. फिर्यादीस तिची केस न्यायालयात पुराव्यासह सिध्द करता आली नाही. म्हणून सबळ पुरावा नसल्याने पुराव्या अभावी न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपीचे वतीने फिर्यादीस फिर्याद दाखल करण्यास झालेला उशिर, जातीवाचक शिवीगाळ करताना पाहिलेला प्रत्यक्ष नसलेला साक्षीदार तसेच फिर्यादी व आरोपी यांचेतील पूर्वीचे वाद याबाबी न्यायालयात सिद्ध केल्या.

दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकल्यानंतर फिर्यादीने दाखल केलेल्या खटल्यात भक्कम पुरावा कोर्टात आला नाही हे सिद्ध झाले म्हणून न्यायालयाने काकासाहेब मारकंडे, गिताबाई मारकंडे आणि राजेंद्र नेव्हल यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपीचे वतीने अ‍ॅड शिवाजी अण्णा कराळे, अ‍ॅड करुणा शिंदे, अ‍ॅड सत्यजीत कराळे यांनी कामकाज पाहिले. त्यांना अ‍ॅड मोनाली कराळे, अ‍ॅड दिप्ती शिंदे, अ‍ॅड समिक्षा उनवणे आणि अ‍ॅड विजय शिंदे यांनी सहकार्य केले.

## बालसाहित्य हे कोणत्याही भाषेच्या समृद्धीचा पाया असते – प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** १९९० नंतरच्या मराठी बालकादंबऱ्यांचा विशेष अभ्यास करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.)ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभागात तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या डॉ.अर्चना क्षीरसागर यांचा पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ.माहेश्वरी गावित यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

क्षीरसागर या सारडा महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत.हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी त्यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, '' बालसाहित्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या,परंतु संशोधनाच्या पातळीवर काहीशा उपेक्षित राहिलेल्या विषयावर त्यांनी हे सखोल संशोधन पूर्ण केले आहे. १९९० नंतरच्या जागतिकीकरण, डिजिटलायझेशन आणि बदलत्या सामाजिक वातावरणाचा मराठी बालकादंबऱ्यांवर झालेला परिणाम या संशोधनात प्रामुख्याने अधोरेखित करण्यात आला आहे. १९९० नंतरच्या बालकादंबऱ्यांमधील विषयांचे बदलते स्वरूप, बालमन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा बालसाहित्यावर झालेला प्रभाव, बालसाहित्यातील आधुनिक भाषिक प्रयोग व शैली या सर्व घटकांचा अभ्यास या संशोधनात समाविष्ट आहे.बालसाहित्य हे कोणत्याही भाषेच्या समृद्धीचा पाया असते. १९९० नंतरच्या बालकादंबऱ्यांचा वेध घेऊन त्यांनी या क्षेत्रातील महत्त्वाची पोकळी भरून काढली आहे. त्यांचे हे संशोधन भविष्यातील अभ्यासकांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरेल.'

सत्कारमूर्ती डॉ. अर्चना क्षीरसागर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,''आजच्या डिजिटल युगात मुलांची वाचनसंस्कृती जपायची असेल तर आधुनिक बालसाहित्याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे होते. या पदवीमुळे माझ्या संशोधनाला योग्य ती पोचपावती मिळाली आहे.' याप्रसंगी मराठी विभागातील प्रा. डॉ. प्रतीक्षा गायकवाड, प्रा.डॉ.संगीता शेळके, प्रा.डॉ.दया जेठे उपस्थित होत्या.

## पैठण आगारात राजमाता जिजाऊ बसचे लोकार्पण; प्रवाशांना मिळणार अधिक दर्जेदार सेवा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पैठण आगारात नव्याने दाखल झालेल्या राजमाता जिजाऊ बसचे लोकार्पण मंगळवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. आमदार विलासबापू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सदस्य शिवराज भैया भुमरे यांच्या हस्ते बसचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष तुषारदादा पाटील, डॉ. भारत झारगड, माजी नगराध्यक्ष राजूभाऊ गायकवाड, यांच्यासह पैठण आगाराचे व्यवस्थापक अमर राऊत, सहाय्यक वाहतूक अधीक्षक महेंद्र आरगडे, वाहतूक निरीक्षक मंजुषा माने, वाहतूक नियंत्रक तथा महिला प्रतिनिधी सुनीता निसर्गन, देवीदास भोजने, सर्जे मॅडम तसेच आगारातील चालक, वाहक आणि यांत्रिक विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन राजमाता जिजाऊ बस सेवेमुळे पैठण परिसरातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी व दर्जेदार प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

# माहितीच्या अभावामुळे दिव्यांगांची मोठी गैरसोय - वसंत शिंदे

## दिव्यांगांसाठी जिल्हा रुग्णालयात माहिती फलक उभारावेत; भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा शल्यचिकित्सकांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा रुग्णालयात ऑनलाइन दिव्यांग प्रमाणपत्र (यूडीआयडी) प्रक्रियेसाठी दर महिन्याच्या प्रत्येक बुधवारी जिल्ह्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिक व त्यांचे नातेवाईक येत असतात. रुग्णालय प्रशासनाने केस पेपर काढण्याची व्यवस्था समाधानकारक केली असली तरी त्यानंतर विविध विभाग, कक्ष क्रमांक आणि तपासणी प्रक्रियेची स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने दिव्यांगांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून देत भारतीय जनता पक्ष दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत गोपीनाथ शिंदे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घागरे यांना निवेदन सादर केले.

निवेदनात रुग्णालयाच्या दर्शनी भागात कायमस्वरूपी माहिती फलक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. या फलकावर २१ प्रकारच्या दिव्यांगांसाठी कोणत्या कक्षात तपासणी होते, संबंधित कक्ष क्रमांक, तपासणीची वेळ, आवश्यक कागदपत्रे तसेच ऑनलाइन प्रमाणपत्र तयार झाल्यानंतर आधार लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर संदेश प्राप्त झाल्यावरच प्रमाणपत्र घेण्यासाठी यावे, अशी स्पष्ट सूचना नमूद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे दिव्यांग नागरिक व




त्यांच्या नातेवाईकांच्या अनावश्यक फेऱ्या थांबून वेळ, पैसा आणि मानसिक त्रासाची बचत होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घागरे यांनी निवेदनाची दखल घेत दिव्यांगांच्या अडचणींबाबत सकारात्मक चर्चा केली. रुग्णालयात येणाऱ्या दिव्यांग नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी दर्शनी भागात सविस्तर माहिती फलक उभारण्याची मागणी रास्त असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या संदर्भातील आवश्यक कार्यवाही करून येत्या दोन दिवसांत माहिती फलक लावण्यात येईल, असे आश्वासनही डॉ. घागरे यांनी शिष्टमंडळाला दिले. त्यांच्या या सकारात्मक भूमिकेबद्दल दिव्यांग विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

या निवेदनावर भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष ईश्वर गुंड, चंद्रकांत काळे, नगर तालुकाध्यक्ष श्रीकांत काळे, नगर शहराध्यक्ष विजय पडोळे, सचिव महेश विभूते तसेच जिल्ह्यातील दिव्यांग बांधव व पदाधिकाऱ्यांच्या वतीने स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन दिव्यांगांसाठी अधिक सुलभ व पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष वसंत गोपीनाथ शिंदे म्हणाले, दिव्यांग नागरिकांना शासनाच्या सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. जिल्हा रुग्णालयात केस पेपरची व्यवस्था चांगली असली तरी त्यानंतर कोणत्या कक्षात जायचे, कोणत्या डॉक्टरांकडे तपासणी होणार आणि पुढील प्रक्रिया काय आहे, याची माहिती उपलब्ध नसल्याने दिव्यांग आणि त्यांच्या कुटुंबीयांना तासन्तास भटकावे लागते. माहितीच्या अभावामुळे होणारा हा त्रास तातडीने थांबविण्यासाठी दर्शनी भागात सविस्तर माहिती फलक उभारणे अत्यंत आवश्यक आहे.

# सेवाभावातून उभे राहिलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल हे रुग्णसेवेचे आदर्श मॉडेल – पेमराज बोथरा

## आचार्य श्री आनंदऋषीजी महाराजांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त विविध आरोग्य शिबिरांना प्रारंभ; जनरल सर्जरी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने उभे राहिलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल हे केवळ उपचार करणारे रुग्णालय नसून सेवाभाव, विश्वास आणि सामाजिक बांधिलकी यांचे जिवंत प्रतीक बनले आहे. सर्वसामान्य रुग्णांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देत हे हॉस्पिटल आज रुग्णसेवेचे आदर्श मॉडेल ठरले असल्याचे गौरवोद्गार बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष तथा उद्योजक पेमराज बोथरा यांनी काढले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त स्व. सौ. जतनबाई मानकचंदजी बोथरा यांच्या स्मरणार्थ बोथरा परिवार (पारस ग्रुप) यांच्या सहकार्याने आयोजित जनरल सर्जरी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून जयंतीनिमित्त आयोजित विविध आरोग्य शिबिरांना औपचारिक प्रारंभ झाला.



यावेळी संतोष बोथरा, सतीश बोथरा, मनीषा बोथरा, संगीता बोथरा, प्रतिभा बोथरा, प्रनेश बोथरा, रोनक बोथरा, गौरव बोथरा, रोहन बोथरा, प्रसन्ना बोथरा, प्रणित बोथरा, खुशक बोथरा, समीक्षा बोथरा, श्रेया बोथरा, दर्शना बोथरा, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, निखीलेंद्र लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, जनरल सर्जन डॉ. भास्कर जाधव, डॉ. महेश घुगे, डॉ. प्रवीण मुनोत, डॉ. विवेक भापकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात निखीलेंद्र लोढा यांनी बोथरा परिवाराच्या सामाजिक कार्याचा आढावा घेताना सांगितले की, उद्योग क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करतानाच बोथरा परिवाराने तन, मन आणि धनाने आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात मोलाचे योगदान दिले आहे. हॉस्पिटलच्या उभारणीपासून ते विस्तारापर्यंत, घरकुल योजना, २५ व्हिजन सेंटरची स्थापना आणि सावेडी येथील नव्या बहुविशेषता रुग्णालयाच्या उभारणीतही या परिवाराचा मोठा सहभाग आहे. मानकचंदजी बोथरा यांनी दिलेला समाजसेवेचा वारसा नवीन पिढी समर्थपणे पुढे नेत असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. वसंत कटारिया यांनी बोथरा परिवाराच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करताना सांगितले की, आर्थिक मदत करणारे अनेक असतात; मात्र स्वतःचा वेळ देऊन कार्य करणारे फार कमी असतात. बोथरा परिवाराने रुग्णसेवेला आपले ध्येय मानून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

प्रणित बोथरा यांनी सांगितले की, ''स्वतःच्या प्रगतीबरोबर समाजाचीही प्रगती झाली पाहिजे,'' हा आजोबा मानकचंदजी बोथरा यांचा संस्कार आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्याच विचारातून नवीन पिढी सामाजिक उत्तरदायित्वाची परंपरा पुढे नेत आहे.

जनरल सर्जन डॉ. भास्कर जाधव यांनी सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या रुग्णसेवेला यंदा २५ वर्षे पूर्ण होत असून, वर्षभर विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून हजारो गरजू रुग्णांना लाभ मिळतो.

# ठाकरे शिवसेनेच्या वतीने स्व. अनिलभैय्या राठोड यांना पुण्यतिथी दिनी अभिवादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या गळ्यातली ताईत असणारे स्व. अनिलभैय्या राठोड यांच्या पुण्यतिथी निम्मित चितळे रोड येथील शिवालयात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी महानगर प्रमुख किरण काळे यांच्यासह विक्रम राठोड, उपजिल्हाप्रमुख दीपकदादा भोसले, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, उपशहर प्रमुख सुनील भोसले जिग्नेश जग्गड, शुभम मिरांडे आदींसह पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी शिवसैनिकांनी स्व. राठोड यांच्या आठवणींना उजाळा दिला. काळे यावेळी म्हणाले, स्व.अनिलभैय्या आज हयात नाहीत. मात्र आजही ते आपल्यात आहेत अशी अनुभूती कायम सामान्य माणसांना मिळत असते. सर्वसामान्यांच्या हिताच्या रक्षणासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. स्व. अनिलभैय्या यांच्या नसण्याची उणीव समस्त नगरकारांच्या मनाला आजही अस्वस्थ करणारी आहे. शिवसेना ही स्व.अनिलभैय्या यांनी दाखवलेल्या सर्वसामान्य जनतेसाठी काम करण्याच्या विचारांवर कायम काम करीत राहील. सर्वसामान्य माणसाने रात्री अपरात्री केव्हाही अनिलभैयांना फोन केला तरी त्यांच्या मदतीला ते तत्परतेने धावून जायचे. आपण फोन केला तर तो फोन उचलला जाईल आणि भैय्या लगेच उपस्थित होतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये होता.

काळे पुढे म्हणाले, अनिलभैय्या आपल्यात नसण्याची आजही एक पोरकेपणाची भावना नगरकरांच्या मनामध्ये आहे. अनिलभैय्या शरीराने जरी आपल्यात नसले तरी त्यांचे विचार जिवंत राहण्याची गरज आहे. म्हणूनच शहरातील ठाकरे शिवसेना त्यांच्या विचारांवर काम करीत असून कायम या विचारांची जपणूक करण्यासाठी कटिबद्ध राहील, अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

# पद्मशाली सोशल फाउंडेशनच्या वतीने १५० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

## विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची प्रेरणा निर्माण करणे हीच खरी समाजसेवा– गणेश अवधूत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षणाच्या प्रवासात आर्थिक अडचणी विद्यार्थ्यांच्या आड येऊ नयेत, या उद्देशाने पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल येथे शहरातील विविध शाळांतील १५० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे यंदाचे दहावे वर्ष असून गेल्या दशकभरात सुमारे १,५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून फाउंडेशनने शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गणेश अवधूत, इंजि.प्रशांत कोक्कुल, इंजि. अक्षय बल्लाळ, अमित सुंकी, बाबासाहेब तिपुले, राजू कोडम उपस्थित होते. यावेळी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, सचिव अजयकुमार लयचेट्टी, उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल, राजेंद्र बुलबुले, वरद लकशेट्टी, ओंकार आडेप, ओंकार जेटला यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या



संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे गणेश अवधूत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''विद्यार्थ्यांना दिलेली प्रत्येक वही त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारी ठरते. शिक्षणासाठी आवश्यक साहित्याची कमतरता कोणाच्याही प्रगतीच्या आड येऊ नये. समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन गरजू विद्यार्थ्यांना आधार दिला, तर अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडू शकतो. पद्मशाली सोशल फाउंडेशनने सातत्याने केलेले सामाजिक कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.''

प्रास्ताविकात ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी म्हणाले, ''सामाजिक कार्यात सातत्य आणि सेवाभाव या दोन गोष्टींवर आमच्या संस्थेचा भर आहे. गेल्या दहा वर्षांत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा प्रयत्न केला आहे. यंदाही शहरातील विविध शाळांतील १५० विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. याशिवाय वारकऱ्यांसाठी सेवा उपक्रम, महाप्रसाद, गरजू रुग्णांना मदत, आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना सहकार्य अशा अनेक सामाजिक उपक्रमांद्वारे फाउंडेशन सातत्याने समाजासाठी कार्यरत आहे.''

यावेळी ट्रस्टचे सचिव अजयकुमार लयचेट्टी यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन दरवर्षी हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने पुढे जातात. समाजातील दात्यांच्या सहकार्यामुळे अशा उपक्रमांना बळ मिळत असून भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा संस्थेचा संकल्प आहे.''

यावर्षी श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक विद्यालय, दादा चौधरी मराठी शाळा, महात्मा फुले विद्यामंदिर, दादा चौधरी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (उक्कडगाव), प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कै. वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा, बालक मंदिर महिला मंडळ, सिताराम सारडा माध्यमिक विद्यालय, मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालय, शारदा विद्यामंदिर, १०८ श्री महंत पंडित सुच्चासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालय, श्रीमती पार्वतीबाई डहाणूरकर कन्या विद्यालय आणि महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर या शाळांमधील प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीनिवास बुरगुल यांनी केले, तर अमित सुंकी यांनी आभार मानले.

# महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** के. जी.महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात माननीय डॉ. स्वाती मुनोत यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या परिसरात



विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांचा तसेच प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण व वृक्षसंवर्धनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाच्या वेळी डॉ. प्रशांत खोपटिकर, डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. रोहिणी क्षीरसागर तसेच प्रा. योगेश चाकोते, सौ. हर्षाली रासकर उपस्थित होते. प्रा. स्नेहल बोरावके यांनी कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनानी करण्यात आला.

# सुनेत्रा पवार यांच्यावरील वक्तव्याचा पारनेर राष्ट्रवादी महिलाकडून निषेध

## महिलांचा अपमान सहन करणार नाही – सुषमा रावडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसकडून करण्यात आलेल्या ''गुंगी गुडिया'' या उल्लेखाचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पारनेर तालुका महिला अध्यक्षा सुषमा रावडे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या प्रकाराला त्यांनी महिलांच्या सन्मानावर आघात करणारा, अपमानास्पद आणि अवमानकारक राजकीय संस्कारांचा नमुना असल्याचे म्हटले. सुषमा रावडे म्हणाल्या, लोकशाहीत सरकारवर किंवा धोरणांवर टीका करणे हा विरोधकांचा अधिकार आहे. मात्र एखाद्या महिला नेत्याचा अवमान करणारी भाषा वापरणे हे कोणत्याही सुसंस्कृत राजकारणाला शोभणारे नाही. महिलांना कमी लेखणारे, त्यांची प्रतिमा मलिन करणारे शब्द समाजात चुकीचा संदेश देतात. राजकीय मतभेद व्यक्त करताना सभ्यता आणि संयम पाळणे ही प्रत्येक पक्षाची जबाबदारी आहे. त्या पुढे म्हणाल्या, इतिहासात गुंगी गुडिया हा शब्द माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबाबतही



वापरला गेला होता आणि नंतर त्यावर व्यापक टीका झाली होती. त्यामुळे अशा अवमानकारक शब्दांचा पुनर्वापर करणे अधिकच दुर्दैवी आहे. रावडे यांनी काँग्रेस नेतृत्वाने या वक्तव्याबद्दल सुनेत्रा वहिनी पवार यांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी करत महिलांच्या सन्मानाच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ठामपणे उभा राहील, असा इशाराही दिला. त्यांनी राजकीय संवादात वैचारिक लढाई व्हावी, मात्र महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचवणारी भाषा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही, असे स्पष्ट केले.

(पान १ वरून)

## शासकीय कामात अडथळा; आरोपीला तीन महिने कैद, दंड

न्यायालयाने आरोपीला भादंवि कलम ३५३ प्रमाणे तीन महिने कैद आणि एक हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास पंधरा दिवस साधी कैद व भादंवि कलम ३३२ प्रमाणे ३ महिने कैद आणि एक हजार रुपये दंड व दंड न भरल्यास पंधरा दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली. सदर खटल्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. मंगेश दिवाणे यांनी कामकाज पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी सहाय्यक फौजदार संजय पठारे आणि पोलीस हवालदार रामदास सोनवणे यांनी मदत केली.

## अल्पवयीन मुलीची हत्या करून पुरावा नष्टकरणाऱ्या आई-वडिलांसह आजीला जन्मठेप

विष प्राशन केल्याचा बनाव रचला होता. मात्र, सरकारी पक्षाने मांडलेला १३ साक्षीदारांचा पुरावा आणि वैद्यकीय अहवाल ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींना दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपी साईनाथ दिनकर गरड, छाया साईनाथ गरड आणि पद्मावती दिनकर गरड यांना भादंवि ३०२ व १२०(ब) अंतर्गत जन्मठेप आणि दंडाची शिक्षा सुनावली. तसेच कलम २०१ अंतर्गत ५ वर्षे सश्रम कारावास ठोठावला. या खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून अनिल देवराम ढगे यांनी काम पाहिले.

पोलीस अधिकाऱ्यांच्या खातेनिहाय चौकशीचे आदेश

तपासात निष्काळजीपणा दाखवल्याबद्दल एपीआय रवींद्र बागुल, पोनि विलास पुजारी, एपीआय शेळके यांच्यासह दोषारोपपत्राची छाननी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर खातेनिहाय चौकशीचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून तीन महिन्यांत ७८६ गुन्हेगार ताब्यात

कायद्यांचा वापर करण्यात आला आहे. टोळी हद्दपारी: मपोकाक कलम ५५ आणि ५६ अन्वये २४ इसमांना हद्दपार. कडक कायदेशीर कारवाई: ३ आरोपींवर एमपीडीए आणि २५ आरोपींवर मकोका (अंतर्गत कारवाई करण्यात आली.

## मंदिर केंद्रीत व्यवस्था निर्माण झाल्यास हिंदू समाजाला पुनर्वैभव प्राप्त होईल- विवेक कुलकर्णी

विवेक कुलकर्णी,ॲड. सुधीर भापकर,स्वागताध्यक्ष प्रसाद ढोकरीकर,महंत पागल बाबा,मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत प्रमुख समीर घरोटे,प्रांत सदस्य ॲड.जयदीप देशपांडे,विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,महेश वैद्य, डॉ. विलास मढीकर, गौरव पठाडे, इंडो आयरिशचे डॉ. राकेश जोंधळे,उमेश देशमुख,आशिष निलेंगे,स्वप्निल देसाई,अनिल गदादे,विनोद दळवी,प्रसाद शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

मोहनबुवा रामदासी यांनी धर्म, संस्कार आणि समाज जागृतीच्या माध्यमातून पुरोहितांनी निभावायच्या जबाबदाऱ्यांवर भाष्य केले. तसेच आज समाजामध्ये खऱ्या अर्थाने पौरोहित्य करणाऱ्या कुटुंबातील मुलांची लग्न होत नाहीत.याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त करतानाच याबाबत विहिंपसारख्या व्यासपीठावरून याबाबत उपाययोजना करण्यात याव्यात.अशी सूचना मांडली.

समीर घरोटे म्हणाले,पुरोहित सेवा शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील अर्चक पुरोहितांना श्रमिक कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.यामुळे सरकारच्या सर्व योजनांचा लाभ मिळेल व पुरोहित वर्ग सशक्त होईल. या कार्यक्रमात अर्चक-पुरोहितांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. ई-श्रम कार्ड,आयुष्यमान भारत कार्ड आदी योजनांचे मार्गदर्शन करण्यात आले.२००हुन अधिक पुरोहितांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी कर्जत,जामखेड व श्रीगोंदा,पाटोदा तालुक्यातील अर्चक,पुरोहित वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अर्चना भणगे यांनी स्वागतगीत सादर केले.गजानन चावरे यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या उद्दिष्टांची माहिती दिली. सूत्रसंचालन उमेश चावरे यांनी केले.प्रसाद ढोकरीकर यांनी आभार मानले.

## आध्यात्मिक विचारांतूनच आपले जीवन सार्थकी लागू शकते - आ संग्राम जगताप

पंडितराव खरपुडे, किशोर डागवाले ,अविनाश घुले, ,दत्ता जाधव ,दत्ता गाडळकर ,महेंद्र पडोळे ,डॉ सुदर्शन गोरे ,माणिकराव विधाते, मंगलताई लोखंडे, पुष्पाताई बोरुडे ,सुरेखा कदम ,हभप प्रभाताई भोंग ,पुष्पा बोरुडे , बजरंग भुतारे,प्रा संजय गारुडकर , अशोक कानडे ,विष्णू फुलसौंदर, हभप बाळकृष्ण महाराज खेसे, जालिंदर महाराज निकम , कैलास खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, नितीन शेरकर, रमेश बनकर, हर्षल म्हस्के, अमोल धाडगे, विकास पटवेकर, विष्णूपंत म्हस्के, अनिल चेडे,बाळासाहेब रडे , अशोकराव कापरे, सुनिल पडोळे, भाऊसाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अशोकराव कानडे आदि उपस्थित होते.

उत्सव समितीप्रमुख छबूनाना जाधव म्हणाले, श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करुन समाजात धार्मिकता वाढावी. त्यातून समाजाची उन्नत्ती व्हावी. उत्सव समितीचे कार्यकर्त तन-मन-धनाने यात सहभागी होत असल्याने सप्ताह यशस्वी होतो. दि. १२ ऑगष्ट पर्यंत चालणार्या सप्ताहांतर्गत विविध किर्तनकारांची किर्तने होणार आहेत तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

याप्रसंगी भगवान फुलसौंदर, अभय आगरकर ,पुष्पाताई बोरुडे आदिंनी या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उत्सव समितीचे कौतुक केले. मंगलताई लेंडकर, उज्वला शेरकर, शैलजा मुळे, अभिषेक खंदारे, सागर जाधव, रमेश बनकर, कमलेश खरपुडे, समर्थ पुंड, मोहित चौधरी, विशाल उदावंत, अक्षय आंबेकर, अक्षय म्हस्के, तनय बोरुडे, उदय पटवेकर, संतोष मेहेत्रे, निखिल डागवाले, संतोष मोकाटे, वैभव आंबेकर, गौरव डागवाले, ऋषिकेश राऊत, मोहित ढवळे, गणेश राऊत, अनिल फुलसौंदर,जालिंदर बोरुडे ,रासकर , आदिंसह उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, परिसरातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक घटमाळ यांनी केले तर आभार कैलास खरपुडे यांनी मानले. प्रारंभी कलश पुजन, प्रतिमा पुजन, ग्रंथपुजन, विणा पुजन, तुलसी पुजन आदिंचे विधीवत पुजन करण्यात आले. सप्ताह यशस्वीतेसाठी उत्सव समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.